# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २१२ वा बुधवार दि.१२ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## मार्चपर्यंत राज्यात २५ लाख 'लखपती दीदी' करणार

मुंबई : महालक्ष्मी सरस हा अत्यंत लोकप्रिय उपक्रम झाला आहे. राज्यभरातील बचत गटांना हक्काचे विक्रीचा साधन उपलब्ध व्हाव यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार करणार. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात मॉल तयार करणार आहोत. त्याचे बरोबर राज्यात आगामी मार्च महिन्यापर्यंत २५ लाख लखपती दीदी करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा, मुंबई येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने ११ ते २३ फेब्रुवारी दरम्यान सुरू राहणा-या महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२५ चे उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले , उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, उमेशचे मुख्य परिचलन अधिकारी परमेश्वर राऊत यांच्यासह राज्यभरातून बचत गटांच्या महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की महालक्ष्मी सरस हा गेली २१ वर्ष अविरत सुरू असलेला उपक्रम आहे. उमेदवार अभियानाची प्रगतीचा मी स्वत: साक्षीदार आहे. उमेदच्या माध्यमातून महालक्ष्मी सरस हा राज्यभरात महिला बचत गटांना एक हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा उपक्रम झाला आहे. महिला बचतगटांची उत्पादने खूप चांगली असतात. पण यांच्या विक्रीसाठी खूप उपाययोजना कराव्या लागतात. यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जिल्हा परिषदेच्या परिसरात उमेद अभियानाच्या माध्यमातून मॉल उभारणार. यासाठी आगामी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल. प्राथमिक स्तरावर दहा जिल्ह्यांत उमेद मॉल उभारण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बचत गटांमार्फत तयार केलेली वस्तू ही खाजगी कंपनीच्या मालापेक्षा अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असून ती अत्यंत माफक दरात उपलब्ध होतात. उमेद च्या माध्यमातून ६० लाख पेक्षा अधिक कुटुंब आर्थिक प्रगती करत आहेत.या माध्यमातून बचत गटातील महिलांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'लखपती दीदी'ही योजना आणली आहे.ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त आहे त्यांना 'लखपती दीदी' म्हटले जाते. आज महाराष्ट्रात ११ लाख पेक्षा जास्त 'लखपती दीदी'आहेत.

स्त्रीशक्ती महाशक्ती मार्च २०२५ पर्यंत २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' करणार आहोत. आगामी कालावधीत १ कोटी महिला लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. स्त्रीशक्ती ही आर्थिक विकासाला गती देणारी एक महाशक्ती होईल. बचत गटांच्या माध्यमातून ही चळवळ सुरू झाली आहे. शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी, लाडकी बहिण योजना, एस. टी. मध्ये प्रवास सवलत यासह अनेक महिला सक्षमीकरणाच्या योजना आणल्या आहेत. लाडका भाऊ म्हणून लाडक्या बहिणींच्या विकासासाठी सदैव पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

## आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये होणार शिंदेंचा समावेश

मुंबई : राज्यातील आपत्ती व्यवस्थापन समितीमधून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वगळण्यात आले होते. त्यामुळे चर्चांना उधाण आले होते. परंतु सरकारकडून हा निर्णय आता फिरवण्यात येणार आहे. राज्य सरकारने या निर्णयात बदल केला असून एकनाथ शिंदेंचा आपत्ती व्यवस्थापन समितीत समावेश करण्यात येणार आहे.



मुंबईमध्ये २००५ मध्ये महापूर आला होता. या महापुरानंतर आपत्ती व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली होती. राज्यातील आपत्तीच्या काळात ही समिती अत्यंत महत्त्वाची मानले जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आता महाराष्ट्रातील व्यवस्थापन समितीचे प्रमुख झाले आहेत. मात्र, एकनाथ शिंदे यांना यातून डावलल्याचे समोर आले होते. विशेष म्हणजे अजित पवार यांच्यासह महसूल, मदत व पुनवर्सन, आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्य समितीच्या मंत्र्यांना या समितीमध्ये स्थान देण्यात आले. परंतु, आपत्ती व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका असणा-या नगर विकास खात्याचे मंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला होता.

आपत्ती व्यवस्थापनात नगरविकास खात्याची भूमिका कायम महत्त्वाची असते. या खात्याचे मंत्री आणि अधिका-यांच्या माध्यमातून यंत्रणा आणि मदत संबंधित घटनास्थळापर्यंत पोहोचवली जाते. तरीही एकनाथ शिंदे यांना आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये न घेतल्याने चर्चांना उधाण आले होते. एकनाथ शिंदे यांना आपत्ती व्यवस्थापन समितीमधून दूर ठेवल्यामुळे महायुतीत वाद निर्माण होऊ शकतो, अशी चर्चा सुरू झाली होती. त्यामुळे आता नियमात बदल करून एकनाथ शिंदे यांना या समितीमध्ये सहभागी करुन घेण्याचा निर्णय झाला आहे. पालकमंत्रीपदाचा वाद जैसे थे

महाराष्ट्रातील सत्ताधारी महायुती सरकारमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर येऊ लागला आहे. रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा वाद अद्याप मिटलेला नाही. त्यातच आता एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदी असताना लाडकी बहीण, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन, शिवभोजन थाळी, आनंदाचा शिधा, लाडका भाऊ, महिलांसाठी गुलाबी रिक्षा आदी विविध योजना राबवल्या.

## 'नीट'साठी आता जातीच्या दाखला

पुणे : यंदाच्या नीट परीक्षेसाठी अर्ज करताना नॅशनल टेस्टिंग एजन्सीने इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना केंद्रीय जातीचा दाखला आवश्यक केला आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे हा दाखला नसेल त्यांना संबंधित विभागाकडे अर्ज करून त्या अर्जाची पोचपावती अर्जासोबत सादर करायची आहे. मात्र, केंद्रीय दाखल्याची मुदत एक वर्षाची असल्याने सर्व विद्यार्थ्यांना केंद्रीय कोट्यातून प्रवेशावेळी पुन्हा केंद्रीय दाखला काढावा लागणार आहे. त्यामुळे पालक व विद्यार्थी गोंधळले आहेत.




नीटसाठी अर्जाची प्रक्रिया सुरू झाली आहे. ११ मार्चपर्यंत अर्जाची मुदत आहे. या काळात काढलेल्या केंद्रीय जातीच्या दाखल्याची मुदत ३१ मार्च २०२५पर्यंतच असेल. मात्र, केंद्रीय कोट्यातून वैद्यकीय प्रवेश घेताना १ एप्रिल २०२५ नंतरचाच दाखला सादर करावा लागणार आहे. त्यामुळे नीटच्या अर्जासाठी यावर्षी काढलेल्या केंद्रीय दाखल्याचा उपयोग ऑल इंडिया कोटासाठीच्या वैद्यकीय प्रवेशासाठी होणार नाही. प्रवेश अर्जासोबत केंद्रीय दाखला आवश्यक करण्याचे एनटीएचे प्रयोजन काय? असा सवाल विद्यार्थी व पालकांकडून उपस्थित होत आहे.

यापूर्वीची पद्धत काय होती?

अर्ज करताना दाखला नसेल तर वैद्यकीय प्रवेश घेताना सदर दाखला हजर करू असे प्रतिज्ञापत्र अपलोड करण्याची संधी गतवर्षी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली होती. यंदाही तशी संधी देण्याची आवश्यकता होती.

एजन्सीकडून पूर्वसूचना नाही

आधारकार्ड अपडेट करण्याविषयी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने पूर्व नोटीस काढली होती. मात्र, केंद्रीय दाखल्यासंबंधी कोणतीही पूर्वसूचना एजन्सीने दिलेली नाही. असे असताना ऐनवेळेस हा दाखला आवश्यक केल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे.

विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा वाया जाणार सध्या देशभरात बारावीची परीक्षा सुरू असल्याने केंद्रीय जातीचा दाखला मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा वाया जाणार आहे. या दाखल्याचा उपयोग परीक्षेपुरता अर्ज करण्यासाठी होणार आहे. वैद्यकीय प्रवेशासाठी नव्याने पुन्हा दाखला काढावा लागेल. त्यामुळे गतवर्षीप्रमाणे राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने केंद्रीय जातीच्या दाखल्याऐवजी सेल्फ डिक्लरेशन फॉर्म अपलोड करण्याची संधी देण्याची आवश्यकता आहे.

## १२वीच्या परिक्षेत कॉपी बहारदारा विरोधात कठोर कारवाई होणार- तहसीलदार अशोक भंडारे

केज/प्रतिनिधी १२ विच्या परिक्षेत कॉपी बहारदारा विरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार अशोक भंडारे यांनी माध्यमाशी बोलताना दिली आहे तर ४ अति संविद्रशील परीक्षा केंद्रावर प्रशासनाची करडी नजर राहणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडस्कर यांनी दिली आहे. याबाबतचे सविस्तर माहिती अशी की,आज दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ पासुन १२ वीची परिक्षा सुरु होत असुन या परिक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने कॉपी मुक्त परिक्षा पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवला आहे. विद्यार्थ्यांनी व पालकांनी कॉपी मुक्त परिक्षा पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे कॉपी बहाद्दराची गय केली जाणार नाही, कठोर कारवाई करण्यात येईल असे प्रशासनाच्या वतीने,केज तहसीलचे तहसीलदार अशोक भंडारे, पोलिस निरीक्षक वैभव पाटील केजचे गटशिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थी व पालक यांना आवाहन केले आहे.




## बीडला करायचेय 'जंक्शन'; विविध कामांसाठी खा.सोनवणे रेल्वेमंत्र्यांच्या भेटीला केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत झाली सकारात्मक चर्चा

केज/प्रतिनिधी अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे काम गतीने सुरू आहे. बीडपर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी देखील झाली असून पुढील वर्षात रेल्वेचे काम परळीपर्यंत पोहचेल व परळी ते मुंबई गाड्या बीडमार्गे जाऊ शकतील. दरम्यान, येडशी-बीड-जालना अथवा धाराशिव-बीड-छ.संभाजीनगर हा रेल्वेमार्ग मंजूर झाला तर बीडला मोठे जंक्शन होईल. यासाठी, खा.बजरंग सोनवणे यांनी दिनांक १० फेब्रुवारी रोजी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. यावेळी नवीन रेल्वे मार्गाबाबत सकारात्मक चर्चा झाली. बीड जिल्हा तसा महाराष्ट्राच्या मध्यभागी असलेला जिल्हा आहे. मात्र, याठिकाणी रेल्वेलाईन नसल्याने येथे मोठे उद्योग येऊ शकले नाही. दळणवळणाचा खर्चीक भाग असल्याने कंपन्या आणि व्यवसायाला चालना मिळालेली नाही. आता अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गाला गती मिळत आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीत विजयाचा गुलाल अंगावर पडताच पहिली बैठक रेल्वेची घेवून आहे त्या रेल्वे मार्गाला गती देण्याचा प्रयत्न केला. त्याचेच फळ आता दिसत असून अवघ्या सहा-सात महिन्यात अंमळनेर ते बीडपर्यंत रेल्वे धावली आहे. दरम्यान, जालना ते येडशी अथवा धाराशिव ते छ. संभाजीनगर हा रेल्वे मार्ग जोडला तर बीडला मोठे जंक्शन होऊ शकते. शिवाय बीड हे राज्यात सेंटरला येऊन विकासाला गती मिळू शकते. हे लक्षात घेवून सोमवारी खा.सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांची भेट घेत, येडशी-बीड-जालना नवीन रेल्वे लाईनसाठी सर्व्हेक्षण करणे तसेच प्रस्तावित धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वे लाईनचे ४८५७.४७ कोटी रुपये अंदाजित रकमेचे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणे. आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गावर बार्शी नाका बीड येथील प्रस्तावित जागेवर नवीन रेल्वे स्थानक/थांबा देणे, ऋआहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गातील उर्वरित प्रलंबित भूसंपादन प्रकरणे तातडीने मंजूर करणे, अशा मागण्यांचे पत्र दिले.



केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी दिले आश्वासन
आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग पूर्ण करण्यासाठी बीड येथे झालेल्या दि. १८ जून २०२४ च्या बैठकीमधे रेल्वे अधिकारी यांचेसोबत झालेल्या बैठकीमध्ये कालबद्ध कार्यक्रम ठरऊन देण्यात आला होता, त्यानुसार कामे पूर्ण करुन घेण्याचे आदेश देऊन इतर सर्व कामांबाबत दखल घेऊन योग्य असेल ती सर्व कामे करणेबाबत आश्वासित केले. छ.संभाजीनगर-गुंटूर, नांदेड-बेंगलुरु व पनवेल-नांदेड या गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा देण्याबाबत चालू असलेल्या कारवाईचा आढावा घेतला.

## गृहखात्याने असेच मन लावून काम केले, तर कृष्णा आंधळे गजाआड होईल

पुणे : शिवसेना शिंदे गटाचे आमदार आणि माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या मुलाला परत आणण्यासाठी पोलिस खाते कामाला लागले होते. चार तासानंतर त्याला हवेतून माघारी आणण्यासाठी यंत्रणांना यश आले. मात्र, संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला ६० दिवस उलटूनही या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळेला पकडण्यात गृहखात्याला अपयश आले आहे. सावंतांच्या मुलाच्या प्रकरणाप्रमाणे गृहखात्याने आंधळेचा शोध घेतला तर त्याला गजाआड करता येईल असा उपरोधिक टोला खासदार सुप्रिया सुळे यांनी हाणला आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महाराष्ट्रातील गृहखाते आणि पोलिस किती तत्पर आहेत याचे उदाहरण काल पहायला मिळाले. सत्ताधारी पक्षाचे आमदार आणि माजी मंत्रीमहोदय तानाजी सावंत यांच्या मुलाचे विमान हवेतल्या हवेत परत बोलावून राज्यातील यंत्रणेने आपली कुशलता सिद्ध केली. परंतु, याच यंत्रणेला मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा साठ दिवसांपासून सापडत नाही, ही बाब पटण्यासारखी नाही.



सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, कालच्या घटनेत वरपासून खालपर्यंत यंत्रणा हलली आणि सदर नेत्याच्या पुत्राचे विमान हवेतल्या हवेत परत फिरले. अशाच पद्धतीने गृहखात्याने मन लावून काम केले, तर कृष्णा आंधळे गजाआड होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अतिविशिष्ट लोकांच्या किरकोळ घरगुती कामांसाठी मनापासून झटणारे गृहखाते सर्वसामान्य माणसांना न्याय मिळवून देण्यासाठी अशीच तत्परता का दाखवत नाही हा खरा प्रश्न आहे, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली. तानाजी सावंत यांच्या मुलासाठी या सरकारने काल रान पेटवले होते. पण ६० दिवस उलटूनही कृष्णा आंधळे सापडत नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, असेही त्या म्हणाल्या.

## संपादकीय....

# मणिपूरची कोंडी फुटणार?

जातीय आणि वांशिक हिंसाचारात होरपळणार्या मणिपूरमध्ये शांततेची नवी पहाट होण्याची आशा निर्माण झाली आहे. या राज्यात लोकशाही प्रक्रिया सुरू करणे, भंगलेली मने आणि समाज जोडणे, आर्थिक प्रश्नावर तोडगा काढणे हाच आजच्या वास्तवावर मार्ग दिसतो. मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांच्या राजीनाम्याने ही कोंडी फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जातीय आणि वांशिक हिंसाचार आटोक्यात आणता न आल्याने हतबल झालेले सरकार, हिंसाचाराच्या रोज नव्या घटनांच्या धगीत होरपळणारा सामान्य माणूस, मैतेई आणि कुकी समाजात उफाळलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेली कमालीची अस्थिरता, त्यातून सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांचा राजीनामा अखेर घेतला. राजीनाम्याची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर मुळातच त्यांनी राजीनामा द्यायला तब्बल २२ महिन्यांचा वेळ लावला. तो वेळीच घेतला गेला असता तर अनेकांचे जीव वाचले असते. राज्याला शांततेच्या मार्गावर आणायचे असेल तर, राजकीय प्रक्रिया सुरू करण्याचा एकमेव मार्ग भारतीय जनता पक्षासमोर उरला होता. तो शोधताना केंद्र सरकार 'ऑपरेशन मणिपूर'साठी तयार झाले आहे, असे आजघडीला म्हणता येऊ शकते. अर्थात या राजकीय उपाययोजना नेमक्या काय असतील हे येत्या काळात महत्त्वाचे ठरेल.

ईशान्येकडील हे राज्य गेल्या दीड-दोन वर्षांपासून दोन समाजातील हिंसाचारात होरपळते आहे. गेल्या दीड वर्षात अडीचशेहून अधिक यात बळी पडले. या दंगली वांशिक आहेत आणि त्यातून घडणार्या हिंसाचाराचे रूप भयंकर आणि हादरवून सोडणारे आहे. आजही हे राज्य केंद्रीय सुरक्षा दलांच्या गराड्यात आहे. शांतता आणण्यात आलेल्या अपयशाने सत्ताधार्यांच्या मर्यादा स्पष्ट झाल्याच, हा प्रश्न सरकारला सोडवायचा आहे की नाही? असा प्रश्न विचारला गेला. केवळ दोन समाजच नव्हे तर या राज्याचे राजकारणही विभागले. हा सर्वात मोठा धोका होता आणि आजही आहे. या प्रश्नावर राजकीय तोडगा किंवा राजकीय प्रक्रिया हा एकमेव मार्ग आहे, याची कल्पना खुद्द सत्ताधार्यांना नसावी, असे म्हणणे धाडसाचे ठरेल! मात्र, ती सुरू करण्यास विलंब झाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यात शांततेसाठी काही प्रयत्न केले. राज्याचा दौराही केला. मात्र, ज्या राजकीय प्रयत्नांची चर्चा केली गेली, ते अपुरे पडले. राज्य सरकार आणि मुख्यमंत्री दुबळे ठरले असताना केंद्र सरकारने या राज्यात हस्तक्षेप करावा आणि रक्तपात थांबवावा, अशी मागणी अनेकदा झाली. मात्र राजकीय इच्छाशक्तीचा पंगुपणा दिसून आला. राज्यात सरकार आहे पण ते नावापुरते. ते काम करत नाही. विरोधक आहेत मात्र हाताच्या बोटावर मोजण्याइतके. विरोधकांकडे संख्याबळ नसल्याने राज्याला विरोधी पक्षनेता नाही. दुबळ्या विरोधकांमुळे समाजातील एका घटकाचा आवाज सत्ताधार्यापर्यंत पोहोचत नाही.

साठ सदस्य असलेल्या विधानसभेत भारतीय जनता पक्ष आघाडीचे बहुमत असले तरी मैतेई-कुकींच्या प्रश्नावर झालेली राजकीय मतविभागणी नाकारणार कशी? भाजपचे १८ हून अधिक आमदार सरकारवर नाराज आहेत. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे 'मुख्यमंत्री हटाओ'ची मागणी केली होती. विशेष म्हणजे विधानसभा अध्यक्षांचाही त्यात समावेश होता. त्याच आधारावर काँग्रेसने संख्याबळ नसतानाही सरकारवर अविश्वास ठराव आणला. संयुक्त जनता दलाचे नितीश कुमार यांनी सरकारचा पाठिंबा मागे घेत दबाव तंत्राचा वापर केला. राज्यातील स्थितीतर हाताबाहेर गेली आहेच, आता हातातले राजकारण निसटण्यापूर्वी भाजपने मुख्यमंत्र्यांचा राजीनामा घेतला. या राजीनाम्याने राज्यात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करण्याची केंद्र सरकारची इच्छा दिसून येते. गेल्या दीड वर्षात प्रथमच त्यादिशेने सरकार ठोस काहीतरी करते आहे. या निर्णयाचे स्वागत केले पाहिजे. राज्यात पुढील वर्षी विधानसभा निवडणुका होतील. त्यासाठीचे हे पहिले पाऊल म्हणता येईल. राजकीय पटलावर राज्यात भारतीय जनता पक्ष प्रबळ असला तरी लोकसभा निवडणुकीतील दोन्ही जागा काँग्रेसने जिंकल्या आहेत. जनतेचे राजकीय आणि न्यायालयीन कचाट्यात अडकलेले प्रश्न चिघळत ठेवून निवडणुकांना सामोरे जाण्याची नामुष्की सत्ताधार्यांवर आली आहे.

एकमेकांशी भिडलेल्या कुकी आणि मैतेई समाजात शांतता प्रस्थापित करण्याबरोबरच विश्वासाचे वातावरण तयार करणे, राज्याच्या राजकीय तसेच सामाजिक प्रक्रियेत आपणास सामावून घेतले जात असल्याची भावना त्यांच्यात निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. ज्या आरक्षणाच्या मुद्द्यावर दोन्ही समाजात तेढ निर्माण झाले ते दूर कसे करणार? याचे नेमके उत्तर आता द्यावे लागणार आहे. संघर्षाच्या तळाशी जसा जातीय आणि वांशिक भेद आहे त्याचबरोबर राज्याच्या आर्थिक सत्तास्थानांवर असलेले प्राबल्य हेही एक महत्त्वाचे कारण आहे. कायद्यातील तरतुदीने मैतेईंना पर्वती भागात राहण्याचे त्याचबरोबर जमीन खरेदी करण्याचे अधिकार नाहीत. राज्यातील केवळ दहा टक्के संपत्तीवर त्यांना अधिकार आहे. राजकारणावर मैतेईंचा प्रभाव व प्राबल्य असूनही डावलले जात असल्याची भावना या समाजात मोठ्या प्रमाणात आहे. पर्वतीय भागासाठी स्वायत्त विकास मंडळ स्थापन्याकडे दुर्लक्ष झाल्याने अनेक जमाती विकास प्रक्रियेपासून दूर राहिल्या. त्यासंदर्भातील तरतूद असलेली सहावी अनुसूची लागू करण्याची मागणी जुनी आहे.

# समस्या, ठेकेदार अन् प्रशासन

नागरी समस्याच नाहीत, असे जगाच्या पाठीवर एकही गाव किंवा शहर नाही. समस्यांची व्याख्या वेगळी असेल, पण समस्यामुक्त ठिकाण शोधूनही सापडणार नाही. मग ते स्वित्झर्लंड, अमेरिका असो, की ब्रिटन. समस्यांवर मात करण्याचा प्रयत्न मात्र भारत सोडून सर्व देशांत होत असावा.

आपल्या देशात सदोष अभियांत्रिकी, अधिकार्यांचे दुर्लक्ष, बेदरकार वृत्ती आणि निकृष्ट कामांमुळे निर्माण होणार्या समस्यांचे प्रमाण मोठे आहे. म्हणजेच प्रशासनाच्या चुकांमुळे त्यांचा जन्म झाला आहे. या चुका दुरुस्त करण्याची तत्परता दाखविणारे विरळेच. त्यामुळे भारतीयांना समस्यांमध्ये जन्मून समस्यांच्या गराड्यातच अखेरचा श्वास घ्यावा लागतो. काही लोकांसाठी मात्र या समस्या म्हणजे इष्टापत्ती ठरतात. कोल्हापूर जिल्ह्यातील उदाहरण ताजे आहे. कसबा बावड्यातील पांडुरंग तात्यांना विठुरायाचा जप करताना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. रुग्णालयातून 'मृतदेह' घरी नेला जात असताना रस्त्यावरील खड्ड्यामुळे वाहिका आदळली अन् पांडुरंग तात्या चक्क जिवंत झाले. ज्या खड्ड्याला प्रत्येक वाहनचालक शिव्याशाप देत होता, तो तात्यांसाठी वरदान ठरला. हा खड्डा कोण अधिकार्याच्या अखत्यारित येतो, याचा शोध घेऊन त्याचा सत्कार करावयास हवा.



भारतातील समस्यांच्या यादीत रस्त्यांचा क्रम पहिला येतो. पंधरा वर्षांपूर्वी राज्यात सिमेंटच्या रस्त्यांचे पेव फुटले. हे रस्ते मजबूत असतात आणि त्यांच्या देखभालीचा खर्चही कमी असतो, असा युक्तिवाद त्यावेळी करण्यात आला होता. त्यानुसार डांबरी रस्ते फोडून सिमेंटचे बांधण्यात आले. पूर्वीच्या रस्त्याच्या पातळीवर जी घरे होती, ती सिमेंटच्या उंच रस्त्यांमुळे खड्ड्यात गेली. त्यात पावसाचे पाणी शिरणे हा शिरस्ताच झाला. त्यावर उपाय म्हणून मग घरांच्या उंबरठ्यांची उंची वाढवावी लागली. काहींनी उंबरठ्यातच कठडे उभारले. मात्र, प्रशासनाला जाग आली नाही. उंबरठ्यांपेक्षा उंच सिमेंट रस्ते बांधण्याची पद्धत अजूनही रूढ आहे. शिवाय, मुंबई-पुण्यातील रस्त्यांचा दर्जा वेगळा आणि इतर शहरे किंवा गावांमधील रस्त्यांचा वेगळा. खर्च मात्र तेवढाच. ग्रामपंचायतींनी बांधलेल्या सिमेंट रस्त्यांपेक्षा पूर्वीची गाडीवाटच बरी, असे म्हणण्याची वेळ आली. भारतीय रस्ते काँग्रेसच्या निकषांनुसार सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांचे आयुष्य ढोबळमानाने ३० ते ५० वर्षे असते. मात्र, देशातील कोणता सिमेंटचा रस्ता ३० वर्षे टिकला हे दाखवा आणि बक्षीस मिळवा, असे जाहीर करण्याची वेळ आली आहे. अनेक अधिकारी कमीत कमी खर्चात काम कसे पूर्ण करता येईल आणि कंत्राटदारांचा 'नफा' कसा वाढेल, याच विचारात आयुष्य घालवताना दिसतात. त्यामुळे लोकांच्या वाट्याला खड्ड्यांची वाट येते. अभियंते कामावर देखरेख ठेवतात की नाही, बांधणीचे निकष कंत्राटदाराकडून पाळले जातात की नाही याची काळजी वरिष्ठदेखील घेत नाहीत. झालेल्या कामाचे सर्वेक्षणही प्रामाणिकपणे केले जात नाही. ही कामे केली नाहीत तर काहीही बिघडत नाही, इतका अभियंत्यांना आत्मविश्वास आहे. त्यामुळे तुमच्या-आमच्या वाट्याला कुचकामी रस्ते येत आहेत. स्थापत्य अभियंत्यांमध्ये जोपर्यंत जबाबदारीची जाणीव येत नाही, जनतेप्रती ते संवेदनशील होत नाहीत, तोपर्यंत देशातील रस्त्यांचे चित्र बदलणार नाही. दर तासाला भूकंप होणार्या जपानमध्येही रस्त्यांची इतकी वाईट अवस्था नाही. बेजबाबदारपणा, बेदरकारपणा आणि खाल्ल्या पगाराला न जागण्याची आणि मिळणार्या पगारात समाधान न मानण्याची वृत्ती भारताच्याच वाट्याला आली आहे. अर्थात, असंवेदनशीलतेच्या या वाळवंटात अण्णा हजारे यांचे राळेगण सिद्धी, पोपटराव पवारांचे हिवरे बाजार आणि भास्करराव पेरे यांचे पाटोदा गाव ओॲसिससारखे उभे आहे. लोक जागरूक झाले की अभियंते, ठेकेदार आणि प्रशासनालाही प्रामाणिकपणे काम करावेच लागते, हे या आधुनिक भगीरथांनी दाखवून दिले आहे.

# विद्यार्थीच नसतील, तर प्राध्यापकभरती कशाला?

'यूजीसी'ची अधिसूचना प्राध्यापक निवड-पदोन्नतीच्या आणि कुलगुरू निवडीच्या निकषांबाबत बोलते. पण, पुरेसे विद्यार्थीच नसतील, तर विभागात प्राध्यापकांची भरती कशाकरता करायची, हा प्रश्न कोणीही उपस्थित करत नाही, हा एक विनोदच नव्हे काय? 'यूजीसी'च्या अधिसूचनेच्या अंगाने एका करिअर समुपदेशकाने उपस्थित केलेले काही प्रश्न. राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये शिक्षणाची दिशा कशी असावी, यावर विविध अंगांनी भरपूर चर्चा झाली व त्याची अंमलबजावणी कशी होणार यातील संदिग्धता २०२४ मध्ये संपली. पण, सरकारने म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसी या सरकारी संस्थेने गेल्या महिन्यात एक अधिसूचना काढून नवीनच गोंधळ निर्माण केला आहे. ही अधिसूचना प्राध्यापक निवड-पदोन्नतीच्या आणि कुलगुरू निवडीच्या निकषांबाबत बोलते. त्यावर हरकती-सूचना मागविण्यात आल्या असून, आता त्या पाठविण्याची अंतिम तारीख २८ फेब्रुवारी करण्यात आली आहे. 'लोकसत्ता'ने विस्तृत मांडणी करून प्राध्यापक निवडीचे निकष, संख्या व प्राध्यापकांच्या पात्रतेतील विविध बदल या प्रश्नांना उत्तर कसे शोधायचे, याची माहिती दिली आहे. या संदर्भात हे सारे ज्यांच्याकरता करायचे, त्या विद्यार्थ्यांची गरज काय आणि गेल्या ६० वर्षांत प्राध्यापक भरतीबद्दल चाललेला सावळा गोंधळ या दोन गोष्टींवर कायम दुर्लक्ष झाले आहे. या दोन्हींना अनुलक्षून कोणताही विचार आजवर केला गेलेला नाही. विद्यार्थ्यांची विषयनिवडीची गरज आणि विद्यार्थी संख्या या दोन्हींचा कोणताही विचार न करता प्रत्येक विभागात प्राध्यापक किती असावेत अशी संख्या ठरवली जाते. मोजके, ठरावीक, मोठी मागणी असलेले विषय सोडता पदवीला अनेक विषय घेण्याची सोय व व्यवस्था आहे. त्यासाठी विद्यार्थी संख्येच्या क्षमतेवर सहसा किमान ४० ते १०० दरम्यान मर्यादा असते. अनेक विषयांना इतके विद्यार्थी कधीही मिळालेले नाहीत, ही गेल्या साठ वर्षांतील आकडेवारी कोणीही तपासून पाहू शकतो. यात नवीन काही घडलेले नाही. पुरेसे विद्यार्थीच नसतील, तर विभागात प्राध्यापकांची भरती कशाकरता करायची, हा प्रश्न कोणीही उपस्थित करत नाही, हा एक विनोदच नव्हे काय?



# मधासह लिंबू पाणी प्यायल्याने खरंच वजन कमी होते? वजन कमी करण्यासाठी उद्योगपती हर्ष गोयंका यांनीही केला होता प्रयत्न; पण वाचा, तज्ज्ञ काय सांगतात.

सध्याच्या धावपळीच्या आयुष्यात आपण अनेकदा आरोग्याकडे लक्ष देत नाही. त्यामुळे वजनवाढीसारख्या समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. वजन कमी करण्यासाठी अनेक जण विविध उपाय करतात. त्यातलाच एक लोकप्रिय उपाय म्हणजे कोमट पाण्यात मध आणि लिंबाचा रस टाकून पिणे. हे वजन कमी करण्यासाठी फायदेशीर असल्याचे मानले जाते. अनेकांच्या मते, या पेयाने दिवसाची सुरुवात केल्याने चयापचय क्षमता वाढते, फॅट्स कमी होते आणि शरीर सुदृढ होते.



उद्योगपती व आरपीजी समूहाचे अध्यक्ष हर्ष गोयंका यांनी मात्र या लोकप्रिय पेयाविषयी आपला अनुभव सांगितला आहे. त्यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर करीत लिहिलेय, मला सांगितले होते की, जर दोन महिने मधाबरोबर लिंबू पाणी दररोज सकाळी प्यायलो, तर तुमचे वजन दोन किलो कमी होईल. दोन महिन्यांनंतर मी दोन किलो लिंबू आणि तीन किलो मध वाया घालावले.

त्यांची ही एक्स पोस्ट सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली आहे. त्यांच्या या पोस्टवर अनेक युजर्सनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका युजरने लिहिलेय, लिंबू आणि मध ही मार्केटिंग ट्रिक आहे. तर एका युजरने लिहिलेय, मला वाटते की, वजन कमी करण्यासाठी लिंबू नाही, तर फक्त मध कोमट पाण्यात टाकून, त्याचे सेवन करावे.

पण खरंच हे पेय वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे का?

याविषयी दी इंडियन एक्स्प्रेसने आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा यांच्या हवाल्याने सविस्तर माहिती जाणून घेतली. त्या सांगतात, सकाळी उपाशीपोटी मध-लिंबूचा रस टाकून कोमट पाणी प्यायल्याने वजन कमी होण्यास, तसेच पचनास मदत होते आणि शरीराला पुरेसे पाणी मिळते; ज्यामुळे शरीरातला पाण्याची कमतरता जाणवत नाही. अति कॅलरीयुक्त पेये टाळून मध-लिंबाचे कोमट पाणी प्यायल्याने शरीरातील एकूण कॅलरीजचे प्रमाण कमी होऊ शकते, तसेच चयापचय क्षमता वाढते आणि भूक कमी लागते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

लिंबामध्ये क जीवनसत्त्व आणि मधामध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे चांगल्या आरोग्यासाठी हे पेय फायदेशीर आहे, असे स्पष्ट करून मल्होत्रा पुढे सांगतात, लिंबाचा रस पचनसंस्थेच्या कार्याला गती देतो आणि मध प्री-बायोटिक म्हणून काम करतो, जी बाब आतड्यांच्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. त्याशिवाय हे पेय शरीराला पाणी पुरवते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करण्यासही मदत करते.

दिवसाची सुरुवात उपाशीपोटी चहाने करण्याऐवजी मधासह लिंबू पाणी सेवन करण्याने करा. तुमच्यासाठी हा एक आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. उपाशीपोटी चहा प्यायल्याने काही वेळा पचनक्रिया बिघडू शकते. मात्र, मध-लिंबाचे पाणी पचनास फायदेशीर असते आणि त्यामुळे पोटाचे आरोग्य चांगले राहते. या पेयाच्या सेवनाने शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत होते आणि त्यामुळे त्वचेचे आरोग्य सुधारून, उर्जेची पातळी वाढते.

मल्होत्रा सांगतात, मधासह लिंबू पाणी हा वजन कमी करण्यासाठी चमत्कारिक उपाय नसला तरी संतुलित आहार आणि दिनचर्येतील तो एक महत्त्वाचा भाग ठरू शकतो. शरीरात साखरेचे सेवन टाळण्यासाठी मधाचे कमी प्रमाणात सेवन करणे गरजेचे आहे.

मध आणि लिंबू एकत्र सेवन केल्याने चयापचयाचे फायदे मिळतात का? किंवा संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीमुळे वजन कमी होते का?

मल्होत्रा सांगतात की, मध आणि लिंबाचे एकत्र सेवन केल्याने चयापचयाचे फायदे मिळू शकतात; पण वजन कमी होणे हे खरे तर एकूण आहार आणि जीवनशैलीवर अवलंबून आहे. मध तुमच्या रक्तातील साखरेची पातळी कमी करूनॉ शकतो आणि जास्त वजन वाढणे रोखतो. लिंबू पचनास मदत करून, शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतो. उपवासादरम्यान लिंबू-मधाचा रस प्यायल्याने वजन आणि बीएमआय कमी होऊ शकतो. लिंबामध्ये असलेले फ्लेव्होनॉइड्स अँटिऑक्सिडंट्समुळे कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइडचे उत्पादन कमी होते मल्होत्रा पुढे सांगतात. मधासह लिंबू पाणी प्यायल्याने चयापचय क्षमता वाढू शकते आणि त्यामुळे तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटू शकते, जे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करू शकतात. या पेयावर अवलंबून राहण्याऐवजी शाश्वत पर्याय निवडा आणि त्यावर लक्ष केंद्रित करा. फळे, भाज्या आणि धान्ये आहारात समाविष्ट करा. भरपूर पाणी प्या.

# ‘ही’ भाजी मांसाहार करणाऱ्यांकरता आवश्यक; असे का?



‘औषधाविना उपचार’च्या गेल्या दोन भागांमधून आपण फळभाज्या आणि शेंगभाज्यांचे महत्त्व समजून घेतले. या भागात आपण उर्वरित भाज्यांची माहिती घेतानाच मांसाहार करणाऱ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या भाजीचीही माहिती घेणार आहोत. मांसाहारामुळे अनेकदा शरीरातील उष्णता वाढण्याची शक्यता असते. त्यावर या भाजीचा वापर हा महत्त्वाचा उताराच ठरतो!

काकडी काकडीचे देशपरत्वे खूप प्रकार आहेत. सर्वांत चांगली काकडी म्हणजे मावळी काकडी होय. त्याच्या खालोखाल नेहमीच्या मिळणाऱ्या काकड्या व तिसऱ्या क्रमांकाच्या काकड्या म्हणजे तवसे म्हणून लांबलचक मोठ्या काकड्यांचा प्रकार होय. मावळी काकडी गोड आहे. तिच्या अधिक सेवनाने कफ, सर्दी, खोकला सहसा येत नाही. विशेषत: कोणत्याही आजारपणानंतर ‘लघुआहार’ सुरू करताना ही काकडी (सिझन असल्यास) जरूर खावी. त्या काकडीमुळे आतड्यांचा क्षोभ कमी होतो. कमीअधिक औषधांनी जेव्हा आतड्यांना दाह होतो, मुलायमपणा कमी होतो तेव्हा काकडी आपल्या स्निग्ध गुणाने आतड्यांचे रोपण किंवा संधानकार्य करते.

# डॉ. उमाकांत जाधव यांच्या चला करू पुस्तकांशी मैत्री या नवोपक्रमाची राज्यस्तरावर निवड

लातूर जिल्हातून श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लातूर येथिल मराठी भाषाविषयाचे अध्यापक डॉ. उमाकांत लक्ष्मणराव जाधव यांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, राज्य पुणे द्वारा आयोजित केलेल्या नवोपक्रम स्पर्धेतील राज्यस्तरीय चवथ्या क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले या राज्यस्तरीय स्पर्धेत लातूर जिल्यातून एकमेव डॉ. उमाकांत लक्ष्मणराव जाधव यांची या उपक्रमात निवड झाली होती ही स्पर्धा राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, डीएड, शिक्षक व मुख्यद्यापकांसाठी राज्य शैक्षणिकसंशोधनवप्रशिक्षणपरिषद, महाराष्ट्र, राज्यपुणेद्वाराआयोजितकेलीहोती.

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत डॉ. उमाकांत लक्ष्मणराव जाधव यांचा माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून चला करू पुस्तकांशी मैत्री या नवोपक्रमास राज्यस्तरीय चवथ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले याप्रसंगी सन्मानचिन्ह ,सन्मानपत्र , पुस्तक देवून त्यांचा सत्कार करण्यात आला राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदे च्या महात्मा फुले सभागृहात या राज्यस्तरीय नवोपक्रम सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी राज्यस्तरीय नवोपक्रमात स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून ११०० स्पर्धकानी सहभाग नोदविला यापैकी केवळ ५० स्पर्धकाची निवड करण्यात आली होतीं माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून चवथ्या क्रमांकानी डॉ. उमाकांत लक्ष्मणराव जाधव यांच्या चला करू पुस्तकांशी मैत्री या पुस्तक अभिप्राय सादरीकरण उपक्रमाची निवड केली गेली या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष्या सहसंचालक सौ अनुराधा ओक यांनी राज्यातील अनेक शिक्षकांनी या स्पर्धेत सहभाग नोदविला ही आनंददायी बाब आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची पुढील वर्षापासून अंमलबजावणी होत आहे.त्याअनुषंगाने हे नवोपक्रम नवीन शैक्षणिक धोरणास सह्यभूत ठरतील असे प्रतिपादन केले कार्यक्रमातील प्रमुख मार्गदर्शिका उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे म्हणाल्या आजच्या आधुनिक काळामध्ये नवोपक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नवोपक्रमाचे नवीन शैक्षनीक धोरणात वेगळेच महत्व निर्माण झाले आहे. शिक्षक व विद्यार्थी या दोन्ही घटकांना प्रेरित करण्यासाठी ही स्पर्धा असून दरवर्षी नाविन्यपूर्ण उपक्रम यात यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली परिक्षक तथा लेखकं शिक्षणतज्ञ हु न जगताप सरानी आपले मनोगत व्यक्त



करताना नवोपक्रमाच्या माध्यमातून शिक्षणाचा दर्जा अधिक सुधारेल व गुणवंत विद्यार्थी घडतील, असा आशावाद त्यानी व्यक्त केला अशा स्पर्धे तून दर्जेदार नवोपक्रम घडतील असा विश्वास त्यानी व्यक्त केला तसेच स्पर्धे त उत्स्फूर्त सहभाग घेतल्याबद्दल राज्यभरातील शिक्षकांचे कौतुक ही केले. लातूर जिल्हातून ही विभागिय संचालक गणपतराव मोरे, उपसंचालक डॉक्टर दत्तात्रय मठपती, डायटचे प्राचार्या डॉ भगिरथी गिरी मॅडम योजना विभागाचे शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे मॅडम, प्राथमिक शिक्षणाधिकारी बंदना फुटाणे मॅडम, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी ज्येष्ठ अधिव्याख्याता डाँ जगन्नाथ कापसे, डॉ राजेश गोरे, जिल्हा समन्वयक सतिष भापकर, विषय निशिकांत नाडे, मेनकुदळे तालुक्यातील साहाय्यक मिरकले, योगेश्वरी मॅडम सर्व गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक तज्ञ शिक्षक, विशेष शिक्षक साधन व्यक्ती यांनी डॉ. उमाकांत लक्ष्मणराव जाधव यांचे कौतुक केले अभिनंदन केले

( फोटो कॅप्शन:- डॉ. उमाकांत लक्ष्मणराव जाधव यांच्या चला करु पुस्तकांशी मैत्री या राज्यस्तरीय नवोपक्रमास राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, राज्य पुणे द्वारा चवथ्या क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले त्यावेळी शिक्षण संचालक राहुल रेखावार, सहसंचालक सौ अनुराधा ओक मॅडम उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे मॅडम जेष्ठ शिक्षणतज्ञ लेखक हु. ना. जगताप सर उपसंचालक श्रीमती माधुरी सावरकर मॅडम डॉ. दत्ता थिटे सर डॉ. सतीश सातपुते सर प्राचार्य भुई सर प्राचार्य. पाटील सर इत्यादी )

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत स्टीफन हॉकिंग यांची जयंती साजरी.

केज/प्रतिनिधी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत स्टीफन हॉकिंग यांची जयंती साजरी करण्यात आली आहे. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेत वैज्ञानिक स्टीफन विल्यम हॉकिंग व




भास्कराचार्य यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ फेब्रुवारी १९४२ रोजी झाला.ते गणित तज्ञ व सैद्धांतिक वैज्ञानिक होते.भास्कराचार्य यांचा जन्म इ.सन १११४ मध्ये कर्नाटकमधील बिजापूर येथे झाला.त्यांनी लिलावती, बीजगणित,ग्रहगणित.इ.ग्रंथ लिहिले. पृथ्वीला सूर्याभोवती एक चक्कर पूर्ण करण्यासाठी ३६५ दिवस लागतात हे सिद्ध केले.ग्रहांची फिरण्याची गती,चंद्र आणि सूर्य ग्रहण इ.अभ्यास त्यांनी केला.अशी माहिती जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी दिली. राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष निमित्ताने भास्कराचार्य यांची माहिती दिली.या शाळेतील शिक्षक श्री भारत बाबुराव हांगे सर, श्री बाळासाहेब भिल्लु राठोड सर, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम, श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनीही सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाळासाहेब भिल्लु राठोड सर यांनी केले व आभार भारत बाबुराव हांगे सर यांनी मानले.

## गंजगोलाई भागातील फळ विक्रेते / इतर फेरीवाले यांना व्यवसायासाठी पर्यायी जागा.

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहरातील गंजगोलाई भागातील व परिसरामध्ये वाहतूकीस अडथळा निर्माण होत असल्याने व मा. उच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन ९६६९/२०१७ व ११५७२/२०१७ मधील दि.०३/०५/२०२३ रोजीच्या आदेशाप्रमाणे गंजगोलाई भागातील / परिसरातमध्ये झालेले भाजीपाला / हात गाडेवाले यांचे अतिक्रमण काढलेले आहे त्या अनुषंगाने गंजगोलाई भागातील फळ विक्रेते / इतर व्यवसाय करणारे फेरीवाले यांना मनपा मालकीच्या सा.क्रं. ८२ फ्रुट मार्केटमध्ये व्यवसाय करणेसाठी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच सदर फळ विक्रेते / इतर व्यवसाय करणारे फेरीवाले यांनी महानगरपालिकेने निश्चित करुन दिलेल्या जागेमध्येच व्यवसाय करावा असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

# थकबाकीदार मालमत्ता धारकासाठी ५०% शास्ती माफी शेवटची संधी

लातूर :- कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या सुरूवातीपासूनच मालमत्ता धारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची योजना लागू करण्यात आल्या होती . त्यानंतर लातूरकराना एक अनोखी भेट म्हणून दिं. २१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत थकबाकीसह चालू अर्थिक वर्षातील संपूर्ण कराचा एक रक्कमी भरणा करणा-या करदात्यास



लातूर शहर महानगरपालिकेमार्फत प्रोत्सानपर बक्षीस योजना राबवण्यात येत आहे., तसेच या वर्षातील शेवटची संधी म्हणून जे मालमत्ताधारक त्यांच्याकडील देय असलेल्या कराचा एक रक्कमी भरणा करतील अशा मालमत्ताधारकांस लातूर शहर महानगरपालिकेमार्फत दिं १२ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत थकीत करावरील व्याज/शास्तीमध्ये ५० टक्के सूट देण्यात येत आहे.तसेच जे मालमत्ताधारक कराचा भरणा करणार नाही अशा मालमत्ताधारकांची मालमत्ता जप्त करून तसेच लिलाव प्रक्रीया राबवून कर वसूल करण्यात येणार आहे.

तरी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी मालमत्ताधारकांनी वरील देण्यात आलेल्या मुदतीमध्ये कर भरणा करून आपल्याकडील देय असलेल्या कराचा भरणा एक रक्कमी करावा व जप्तीसारखी कठू कार्यवाही टाळावी असे आव्हान आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे

# सकाळच्या नाश्त्यात हेल्दी पदार्थ शोधताय? मग सोप्या पद्धतीमध्ये बनवा बीटरूट इडली, नोट करून घ्या रेसिपी

सकाळच्या नाश्त्यात हेल्दी आणि पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे. कारण सकाळच्या वेळी नाश्ता केल्यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि दुपारी लवकर भूक लागत नाही. नाश्ता केल्यामुळे संपूर्ण दिवस आनंद आणि उत्साहाने भरलेले जातो. त्यामुळे सकाळच्या वेळी पोटभर आणि पौष्टिक नाश्त्याचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये बीटरूट इडली बनवण्याची रेसिपी सांगणार आहोत. चवीला तुरट असलेले बीट लहान मुलांसह मोठ्यांसुद्धा खायला आवडत नाही. पण बीट खाणे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. बीटमध्ये लोह, कॅल्शियम, विटामिन सी इत्यादी अनेक घटक आढळून येतात. शरीरात निर्माण झालेली रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात बीटचे सेवन करावे. याशिवाय इडली खाल्यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि लवकर भूक लागत नाही. चला तर जाणून घेउया बीटरूट इडली बनवण्याची सोपी रेसिपी.(फोटो सौजन्य - ळडींलझ्ञ)





साहित्य:

बीट
तांदूळ
उडीद डाळ
मीठ
सोडा
आलं
हिंग पाणी

कृती:

बीटरूट इडली बनवण्यासाठी सर्वप्रथम, तांदूळ जाणीव उडीद डाळ पाण्यात ५ तास भिजवून ठेवा.

त्यानंतर ५ तासांनी त्यातील पाणी काढून मिक्सच्या भांड्यात डाळ, तांदूळ, आल्याचा बारीक तुकडा आणि किसून घेतलेले बीट टाकून व्यवस्थित बारीक पेस्ट तयार करून घ्या.

पेस्ट तयार करून झाल्यानंतर त्यात हिंग आणि चिमूटभर सोडा, चवीनुसार मीठ घालून मिक्स करून घ्या.

इडलीचे बॅटर बनवताना त्यात जास्त पाणी टाकू नये, अन्यथा इडलीचे पीठ पातळ होण्याची शक्यता असते.

इडलीच्या भांड्याला तेल लावून त्यात तयार करून घेतलेले इडलीचे बॅटर टाकून १५ मिनिटं इडली वाफवण्यासाठी ठेवा.

तयार झाल्यानंतर इडली थंड करून चटणीसोबत खाण्यासाठी सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले बीटरूटची पौष्टिक इडली.

# कष्ट हेच गरीबांच्या आर्थिक प्रगतीसाठीचे भांडवल:अशोकराव कुलकर्णी गौरकर

लातूर :– कोणत्याही समाजात संवाद महत्वाचा आहे,संवादाचा धागा तुटला तर सर्व काही तुटणार आहे,अशावेळी ज्येष्ठांनी पुढे येणे गरजेचे आहे,असे सांगून सध्याचे युग हे स्पर्धेचे,प्रसार–प्रचाराचे आणि मार्केटिंगचे आहे,यात मला वेळ नाही,माझी परिस्थिती नाही असे सांगून आता कोणालाही थांबता येणार नाही,त्यासाठी कठोर परिश्रम,कष्ट उपसणे आवश्यक आहे किंबहुना कष्ट हेच गरीबांच्या आर्थिक प्रगतीसाठीचे भांडवल आहे,असे प्रतिपादन आदर्श शिक्षक अशोकराव कुलकर्णी गौरकर यांनी येथे केले. स्वातंत्र्य सैनिक सोसायटीतील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात रविवारी सायंकाळी ज्येष्ठांची स्नेह भेट कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

सध्यासमाजा–समाजात,जाती–धर्मांच्या लोकांमध्ये गैरसमजातून,अकारण तेढ वाढत आहे,ती कोणालाही परवाडणारी नाही,आमच्या सारखी माणसं गेली पाच दशके विविध जाती,धर्मांच्या व्यक्तींशी जिव्हाळ्याचा स्नेह ठेवून आहोत,त्यामुळे आयुष्याचा सुर्य माळवत चालला तरी भेटीची आस काही कमी होत नाही,म्हणून स्नेह भेट पुन्हा घ्यावी वाटते,असे सांगून अशोकराव कुलकर्णी म्हणाले की, स्वातंत्र्य सेनानी बाबासाहेब परांजपे, देविसिंग चौहान,केशवराव सोनवणे,शिवाजीराव नाडे यासारख्या



धुरिणांनी लातूर परिसरात निस्वार्थ भावनेने समाज,ि शक्षण,राजकारण,सहकार,सााहित्य क्षेत्रात खुप मोलाचे काम केले,त्यांच्या कार्याची नव्या पिढ्यांना माहिती करुन देण्याचे काम ग्रंथालयातून केले जावे,वृत्तपत्रातून त्या त्यागींचा जागर व्हावा,ज्ञानाचा प्रसार प्रत्येकाने केला पाहिजे.पन्नास वर्षाखाली लातूरच्या पूर्व भागात शिक्षणाचा प्रसार नव्हता अशावेळी,मनोहरराव आल्टे,शंकर इंगळे,अमृतराव सुर्यवंशी,बाबुराव होळीकर यांच्या सारख्यांनी सिध्दार्थ शाळेच्या माध्यमातून कष्टकर्यांच्या लेकरांना शिक्षण दिल्याने अनेक विद्यार्थी नोकरीत लागले,प्रबोधनाचे काम केले.गरीबांच्या घरात सुखाचे दिवस आले,ज्ञानोबा कांबळें सारखे समाज सेवक,सुर्यभान लातूरकरांसारखे शिक्षक आदर्श आहेत.अशा गुणी माणसांचा सहवास लाभला आणि कृतार्थ झालो,असेही ते म्हणाले.

या प्रसंगी अमृतराव सूर्यवंशी,ज्ञानोबा कांबळे,सूर्यभान लातूरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. अशोकराव कुलकर्णी यांच्यावतीने साहित्यिक अमृतराव सूर्यवंशी,कार्यकर्ते ज्ञानोबा कांबळे,सूर्यभान लातूरकर आणि ग्रंथपाल अंजुषा काटे,पत्रकार बाळ होळीकर यांचा उपरणे,हार देवून सन्मान करण्यात आला.त्यांचाही वाचनालयाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.अल्पोपहाराने सांगता झाली.

या स्नेह भेट कार्यक्रमाला महादेव राऊत,प्रल्हाद गायकवाड,नितीन माने,विद्याराणी माने,माने मावशी ,काशिनाथ रत्नपारखे यांच्यासह अनेक वाचक उपस्थित होते.

# महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या महिती तंत्रज्ञान विभागाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी पवन गादेवार यांची निवड

नांदेड :– महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेची सर्वसाधारण सभा अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती यात विविध विषयांवर साधक बाधक चर्चा झाली व मुख्य विषय म्हणजे माहिती तंत्रज्ञान विभागाच्या जागा विषय निवडी संदर्भात महासंभेनी चाचपणी करून नांदेडच्या नायगांव शहरातील युवा उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते पवन गादेवार यांची माहिती तंत्रज्ञान विभागाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली व त्यांना अध्यक्ष नंदकुमार दत्तात्रय गादेवार (महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा) गोविंदराव बिडवई महासचिव (आर्य वैश्य महासभा) ज्ञानेश्वर दासोपंत महाजन कोषाध्यक्ष (आर्य वैश्य महासभा) यांच्या वतीने सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य व समाजासोबत सदैव अग्रेसर समाजातील प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होतात उद्योग व्यवसाय असूनही समाजासाठी तळमळ लाख



मोलाचा कार्य बाजूला ठेवून समाज बांधवांच्या मदतीला धावून येतात त्यांच्या कार्याची दखल घेऊन महासभेने निवड केली आहे निवडीने सर्वत्र अभिनंदन केले जात आहे

# साहित्य वाचनातून सकारात्मक विचारांची दिशा मिळते प्रा. डॉ. प्रशांत भंडे

देवणी :– माणसाला मानसिकदृष्ट्या निरोगी व आनंदी ठेवण्यासाठी साहित्य वाचन गरजेचे असून साहित्य वाचनातून अलौकिक आनंद मिळतो तसेच सकारात्मक विचारांची दिशा मिळते. म्हणून प्रत्येकानी वाचन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. प्रशांत भंडे (मराठी विभागप्रमुख, कै. रसिका महाविद्यालय देवणी) यांनी केले. पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणीच्या वतीने बोरोळ ता. देवणी येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामध्ये 'वाचन संस्कृती' या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहशिक्षिका मीनाताई कांबळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कर्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कांत जाधव यांनी केले. शासनाच्या निर्देशानुसार ग्रामीण भागामध्ये 'युथ फॉर माय भारत आणि युथ फॉर डिजिटल लिटरसी' या संकल्पनेसाठी ग्रामीण भागामध्ये तरुणांचे सक्षमीकरण करणे आणि डिजिटल साक्षरता निर्माण करण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन केले असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमात सुप्रसिद्ध कवी आनंत कदम यांनी विद्यार्थ्यांनी वक्तृत्व कलेचे कौशल्य आत्मसात करावे व आपले भविष्य उज्वल करावे असे आवाहन केले. यावेळी कु. गायत्री बिरादार, कु. श्रावणी रोळे, या विद्यार्थिनींनी आपली उत्कृष्ट वक्तृत्व कला सादर केली. यावेळी प्राचार्य सतीश शेंडगे, सेवानिवृत्त श्री संजय खुळे, पत्रकार प्रताप कोयले,माजी सहकार्यक्रमाधिकारी डॉ. कोंडिबा कांदे,प्राचार्य डॉ. दामावले, उपप्राचार्य शेळके सर, कार्यक्रमाधिकारी डॉ.कांत जाधव, यांच्यासह विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल बालूरे यांनी केले. आभार डॉ .बी. एन.नागलगावे यांनी व्यक्त केले.

# येळी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात



येळी सप्ताहातील शोभायात्रेत महिला ,बालक ,व वारकर्यांनी पाउल खेळत घेतला फुगडीचा आनंद ,,

औसा :– औसा तालुक्यातील येळी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला आज सुरुवात झाली असुन गेल्या चौदा वर्षापासुन येळी येथे अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो ,आज येळी येथील विठ्ठल रुक्मिनी मंदिरात प्रतीवर्षाप्रमाने अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली असुन या सप्ताहात येळी येथे प्रति पंढरपुर प्रमाने येळी गावात भक्तीमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो पुढील सात दिवसात येळी येथील सप्ताहात ज्ञानेश्वरी पारायण ,गाथा भजन ,महिलांचे भजन ,भागवत कथा ,सह सुश्राव्य किर्तनकाराच्या मुखातुन किर्तनाचा आनंद घेता येणार आहे ,येळी येथील विठ्ठल रुक्मिनी मंदीराला औसा तालुक्याचे लोकप्रीय आ.अभिमन्यु पवार यांच्या निधीतुन सभामंडप देण्यात आले आसुन आमदार साहेबांनी सभामंडप दिल्याने गावातील भाविकांना आ.अभिमन्यु पवार यांचे आभार मानले व येळी येथील विठ्ठल रुक्मिनी मंदीराच्या समोरील खुल्या जागेत नविन सभाग्रहाची मागणीही ग्रामस्थांनी केली यावेळी .,सरपंच विक्रम कांबळे ,उपसरपंच अजीत धुमाळ ,बाबुराव धुमाळ ,सुरेश किरवले ,प्रविन भोसले ,बालाजी महाराज येळीकर ,चोपदार माधव भोसले ,उत्तम धुमाळ ,नागेश धुमाळ ,शिवाजी कीरवले ,परमेश्वर मठपती ,रामेश्वर कीरवले ,संजय धुमाळ ,सुग्रीव डांगे सह येळी गावाती भाविक व ग्रामस्थ उपस्थीत होते ,

# टेरवचे सुधाकर कदम क्षत्रिय मराठा कदम परिवाराच्या राज्यस्तरीय संमेलनात सन्मानित

खेड / प्रतिनीधी: क्षत्रिय मराठा कदम परिवाराचे ७ वे राज्यस्तरीय कुलसंमेलन नुकतेच जामगे, खेड येथे संपन्न झाले. सदर प्रसंगी मा. ना. योगेशदादा कदम, गृह (शहरी), महसूल, ग्रामीण विकास व पंचायती राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषधी प्रशासन विभाग राज्यमंत्री यांच्या शुभहस्ते व मा. बाबुराव कदम कोहळीकर आमदार हदगाव नांदेड, मा. आमदार अनिल कदम, निफाड, मा. महाराष्ट्र केसरी अप्पासाहेब कदम, उद्योजग गजानन कदम प्रा. डॉ. सतीश कदम अध्यक्ष अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, मा. सुनील कदम शस्त्र संग्राहक, मा. रामजी कदम सचिव, व मा. अमरराजे कदम अध्यक्ष क्षत्रिय मराठा कदम परिवार (महाराष्ट्र राज्य) व अध्यक्ष श्री तुळजा भवानी भोपे पुजारी मंडळ, तुळजापूर या व इतर मान्यवरांच्या उपस्थित दसपटी विभागातील चिपळूण तालुक्यातील टेरव गावचे सुपुत्र व सरस्वती कोचिंग क्लासेस, मुंबईचे संचालक सुधाकर कदम यांच्या शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक कार्याची दखल घेऊन त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, पोपाट कदम लिखीत कदम कुळाचा इतिहास हे पुस्तक तसेच श्री क्षेत्र तुळजाभवानी मातेचे कुंकू, प्रसाद व कवड्याची माळ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच मंचावरील उपस्थित सर्व मान्यवरांना




कुलस्वामिनी श्री भवानी वाघजाई मंदिर श्री क्षेत्र टेरव, चिपळूण देवस्थानची दिनदर्शिका व टेबल दिनदर्शिका देवून मंदिरास भेट देण्यासाठी निमंत्रित करण्यात आले. सदर संमेलनास संपूर्ण महाराष्ट्रातून तसेच गुजरात व गोवा येथून हजारो क्षत्रिय मराठा कदम बांधव उपस्थित होते.

# सिद्धेश्वर व रत्नेशवर देवस्थान यात्रेचे खाजगीकरण व व्यापारीकरण थांबवनण्याची जिल्हाधिकारी व धर्मदाय आयुक्तकडे केली मागणी.

लातूर / प्रतिनिधी :– लातूर येथील ७०० वर्ष जुने ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या यात्रेची पौराणिक उज्वल परंपरा कोरोना काळातील दोन वर्षे सोडलीतर गेली ७१ वर्षांपासून अखंडपणे पारंपरिक पद्धतीने सतत सुरू असून या यात्रेतून देशव्यापी कृषी प्रदर्शन, कुस्ती स्पर्धा, विविध पशु प्रदर्शन, संस्कृतीक कार्यक्रम यात्रा मोहत्सवाच्या माध्यमातून होतात, तसेच विविध बहू आयामी वस्तुंची खरेदी विक्री, लोककला आशा विविधतेणे नटलेल्या या यात्रेत लातूर शहरासह ग्रामीण भागातील व राज्यातून, परराज्यातून यात्रे करू या यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित राहातात. सिद्धेश्वर व रत्नेश्वर यात्रेला गेली ५ वर्षापासून पारंपरिक मूळ स्वरूप बदलून व्यापारीकरणं मोठ्या संख्येने होत असल्याचे बुधवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करून आनंदमेळा नावाने खाजगी कंत्राटदारा मार्फत यात्रा चालवली जात असून यात्रेत प्रवेशासाठी शुल्क आकारणी, देवदर्शना करिता दर्शन पास शुल्क आकारणी, यात्रेतील व्यावसायिकांना जास्तीचे भाडेसह विविध आकारण्या आकारले जात असल्याने सदरची यात्रा ही सर्वसामावेशक यात्रा असल्याची ओळख पुसून



या यात्रेचे बाजारीकरण करून महागडी यात्रा म्हणून या यात्रेची महाराष्ट्रात ओळख झाली आहे. परिणामी यात्रेचे मूळ स्वरूप हरवून सिद्धेश्वर यात्रा महोत्सव व्यापारीकरण झाले असून गुत्तेदारा मार्फत सामान्य यात्रेकरूंची होणारी आर्थिक लूट थांबण्याकरिता यात्रेचे खाजगीकरण, बाजारीकरण थांबवन्याची मागणीचे निवेदन मा. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे व धर्मदाय आयुक्त यांना देण्यात आले. लातूर शहरातील सिद्धेश्वर व रत्नेश्वर यात्रेचे व्हीआयपी पास म्हणून लातूर शहरातील अधिकारी, कार्यकर्ते व संचालक बॉडी वरील सदस्य आणि त्यांच्या जवळील नातेवाईकांना त्यांची सोय वेगळी म्हणजे त्यांना यात्रा मोफत व्हावी म्हणून व्हीआयपी पास दिले जाते ते बंद करावे सर्वांना समान यात्रा व्हावी म्हणून ही यात्रा खाजगीकरण व व्यापारीकरण न करता ते बंद करावे म्हणून निवेदन दिले असल्याचे सामाजिक कार्यकर्ते नितीन चालक यांनी बोलताना सांगितले. सदरील निवेदनावर पूर्वभाग कृती समिती अध्यक्ष दीपक गंगणे, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते नितीन चालक, मुनावर शेख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ठरू लागला त्रासदायक राष्ट्रीय महामार्ग वाहनांसाठी, खड्ड्यात साचलेल्या पाण्याची समस्या अजून किती दिवस?

किनवट:शेख शौकत :–राष्ट्रीय महामार्गावरील गोकुंदा रेल्वे गेटवरील उड्डाणपुलाच्या कामाला अद्याप सुरुवात झाली नाही असा दिसून येत आहे. त्यातच गोकुंदा शिव ते ठाकरे चौक या महामार्गावर धुळीची व घाण पाणी वाहण्याची समस्या गंभीर बनली आहे. या महामार्गाचे भिजत घोंगडे आणखी किती दिवस, असा प्रश्न या मार्गाने ये–जा करणारे उपस्थित करत आहेत. नांदेड, भोकर, हिमायतनगर, किनवट, माहूर, धनोडा या राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ ए चा किनवट ते गोकुंदा शिव ते ठाकरे चौकादरम्यान सब ग्रेड, बेड व सिमेंट कॉंक्रीटचे काम हाती घेतले वर्षापासून राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम होईना नसल्याने सामान्य जनता व वाहनधारकांना धुळीचा सामना करावा लागत आहे. धूळ नाकातोंडात जाऊन श्वसनाचा त्रास सहन करावा लागत आहे. डोळ्यांत धूळ जाऊन डोळ्यांचा आजार जडू लागला आहे. तर याच महामार्गावर पेट्रोल पंपाजवळ



खड्डे पडून त्यात नालीचे घाण पाणीच पाणी साचल्याने ते अंगावर उडून कपडे खराब होऊ लागले आहेत. दुचाकी, तीनचाकी वाहन चालवताना मोठी समस्या निर्माण होऊ लागली आहे. याच महामार्गावर गोकुंदा रेल्वे गेटवर उड्डाणपूल मंजूर आहे. डिझाइन व इतर काही कारणाने मधल्या काळात काम थांबले होते. पण, या रेल्वे उड्डाणपुलाचे भिजत घोंगडे कायम असून रेल्वेगेट पडल्याने पंधरा ते वीस मिनिटे वाहतूक ठप्प होत आहे. ॲलर्जी आणि दम्याच्या रुग्णांसाठी धूळ आणि नालीचे घाण पाणी आजारी लोकांसाठी ते घातक आहेत अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. रेल्वे उड्डाणपूल व महामार्गाचे काम हाती घ्यावे,अशी मागणी लोकनेते संदीप निखाते व वाहन चालकांनी केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE